नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**राज्य मराठी विकास संस्था**
**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,**
**धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६**
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in
इ-पत्ता **rmvs_mumbai@yahoo.com** , bmay2526.rmvs3gmail.com

# आवाहन

## बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात) मराठी माध्यमांच्या शाळांना व विद्यार्थांना शैक्षणिक साधनांचे वाटप सन २०२५-२६

महाराष्ट्र राज्याने २०१० साली स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणातील प्रकरण ४ "भाषा आणि साहित्य" याअंतर्गत - बृहन्महाराष्ट्र या विभागात बृहन्महाराष्ट्रातील मंडळांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने 'बृहन्महाराष्ट्रातील संस्था / मंडळांना अर्थसाहाय्य' ही योजना राज्य मराठी विकास संस्थेकडून राबविण्यात येते. या योजनेतंर्गत "महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना / मंडळांना तसेच महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथ प्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसाहाय्य देण्यात येते."

याच योजनेचा एक भाग म्हणून शासन मान्यता प्राप्त **'बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात) मराठी माध्यमांच्या शाळांना व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचे वाटप'** ही योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेतंर्गत बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात) शासन मान्यता प्राप्त मराठी शाळांना व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, बाल मासिके, मराठी वृत्तपत्रे, शिक्षकांसाठी संदर्भसाधने यांचे विनामूल्य वाटप करण्यात येणार आहे.

या योजनेतंर्गत ठरविण्यात आलेल्या अटी-शर्तींनुसार महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या मराठी माध्यमांच्या शाळांना अटी-शर्तींनुसार पात्र ठरणाऱ्या प्राथम्यक्रमांवरील १० शाळांना रु. १० लक्ष एकूण खर्चाच्या मर्यादेत प्रत्येकी रु. १ लक्ष इतक्या कमाल मर्यादेत शैक्षणिक साधनांचे वाटप करण्याचे योजिले आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात 'बृहन्महाराष्ट्रातील मराठी शाळांना व विद्यार्थ्यांना शौक्षणिक साधनांचे वाटप' या योजनेतंर्गत मराठी माध्यमांच्या शाळांकडून दिनांक ०१/०१/ २०२६ ते २०/०१/ २०२६ या कालावधीत विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेसंदर्भातील कार्यपद्धती व निकष, बृहन्महाराष्ट्रातील शाळांसाठी मार्गदर्शक सूचना, विहित नमुन्यातील अर्ज तसेच इतर तपशील राज्य मराठी संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या व महाराष्ट्र शासनाच्या http://maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळांवर **'नवीन संदेश'** या सदरात **'बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात) मराठी शाळांना व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचे वाटप' सन २०२५-२६** या शीर्षकाखाली उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

सदर योजनेचे अर्ज विहित नमुन्यात व विहित कालावधीत दि. ०१/०१/२०२६ ते २०/०१/२०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. अंतिम तारखेच्या कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

महाराष्ट्र राज्याबाहेरील बृहन्महाराष्ट्रात मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मराठी माध्यमांच्या शाळांना सदर योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

## बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात)
## मराठी माध्यमांच्या शाळांना व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचे वाटप
## सन २०२५-२६
## कार्यपद्धती, निकष व अटी-शर्ती

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्याने २०१० साली स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणातील प्रकरण ४ "भाषा आणि साहित्य" याअंतर्गत - बृहन्महाराष्ट्र या विभागात बृहन्महाराष्ट्रातील मंडळांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने 'बृहन्महाराष्ट्रातील संस्था / मंडळांना अर्थसाहाय्य' ही योजना राज्य मराठी विकास संस्थेकडून राबविण्यात येते.

याच योजनेचा एक भाग म्हणून शासन मान्यता प्राप्त 'बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात) मराठी माध्यमांच्या शाळांना व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचे वाटप' करण्याचे योजिले आहे. या योजनेतंर्गत महाराष्ट्राबाहेरील इतर राज्यात मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या अशा मराठी माध्यमांच्या शाळांना पहिली ते दहावी पर्यंतच्या गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना विनामूल्य मराठी पाठ्यपुस्तकांचे, बाल मासिके, मराठी वृत्तपत्रे, शिक्षकांसाठी संदर्भसाधनांचे विनामूल्य वाटप करण्याचे राज्य मराठी विकास संस्थेच्या विचाराधीन आहे.

राज्य मराठी विकास संस्थेच्या विहित कार्यपद्धतीनुसार ठरविण्यात आलेल्या अटी-शर्तीनुसार महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या मराठी माध्यमांच्या शाळांना अटी-शर्तीनुसार पात्र ठरणाऱ्या प्राथम्यक्रमांवरील १० शाळांना रु. १ लक्ष रुपयांच्या कमाल मर्यादेत मराठी पाठ्यपुस्तके, बाल मासिके, मराठी वृत्तपत्रे, शिक्षकांसाठी संदर्भसाधने यांचे विनामूल्य वाटप करण्यात येणार आहे. त्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यपद्धती व निकष यांसाठीच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे ठरविण्यात येत आहेत.

**कार्यपद्धती व निकष :-**

(अ) बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात) मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या मराठी माध्यमांच्या शाळांना विनामूल्य पाठ्यपुस्तकांचे, महाराष्ट्रात प्रसिद्ध होणाऱ्या प्रमुख मराठी वृत्तपत्रांचे बाल मासिकांचे आणि शिक्षकांसाठी संदर्भसाधनांचे वाटप करण्याबाबतची कार्यपद्धती -

१. महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मराठी माध्यमांच्या शाळांना मदत करण्याच्या अनुषंगाने राज्य मराठी विकास संस्थेने, दरवर्षी वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागवावेत. विहित कालमर्यादेनंतर येणाऱ्या अर्जांचा शैक्षणिक साधनांचे वाटप करण्यासाठी विचार केला जाणार नाही, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा.

२. राज्य मराठी विकास संस्थेच्या नियोजनानुसार या योजनेची जाहिरात देऊन अर्ज मागवण्याचा दिनांक व कालावधी यात बदल करण्याचे अधिकार संस्थेला असतील.

३. सदर जाहिरात / निवेदन राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग तसेच महाराष्ट्र शासन यांच्या संकेतस्थळांवरही प्रसिद्ध करावी.

४. सदर जाहिरातीस अनुसरून बृहन्महाराष्ट्रातील मराठी माध्यमांच्या शाळा यांच्या मुख्याध्यापक / संस्था यांनी शाळा शासन मान्यता प्राप्त आहे किंवा नाही त्यांचा नोंदणी क्रमांक व दिनांक परिशिष्ट अ मध्ये जोडलेल्या विहित अर्जासह राज्य मराठी विकास संस्थेकडे विहित कालमर्यादेत पाठविणे आवश्यक आहे.

५. राज्य मराठी विकास संस्थेने, प्राथम्यक्रमांनुसार प्राप्त झालेल्या १० मराठी माध्यमांच्या शाळांना रु. १ लक्षच्या कमाल मर्यादेत पाठ्यपुस्तके, बाल मासिके, मराठी वृत्तपत्रे आणि शिक्षकांसाठी संदर्भसाधने यांचे विनामूल्य वाटप करावे.

६. प्राप्त झालेले अर्ज / शाळांची माहिती राज्य मराठी विकास संस्थेच्या विहित कार्यपद्धतीनुसार प्रकल्प व वित्त समितीची मान्यता घेऊन, कार्यकारी समितीच्या बैठकीत अंतिम निवड करण्यासाठी सादर करावेत व सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या, पात्र ठरलेल्या मराठी माध्यमांच्या शाळांना प्रचलित धोरणानुसार मदत करावी.

**(आ) अर्ज करणाऱ्या मराठी माध्यमांच्या शाळांकरितांचे निकष :-**

१. राज्य मराठी विकास संस्थेकडे विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त होणाऱ्या, महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त मराठी माध्यामांच्या शाळांची माहिती, शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षकांची संख्या, शाळांमध्ये मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती संवर्धनासाठी राबविले जाणारे उपक्रम या अनुषंगाने मदत करण्यासंदर्भात प्राथम्यक्रमांनुसार विचार करण्यात येईल.

२. राज्य मराठी विकास संस्थेच्या उद्दिष्टांनुसार विद्यार्थ्यांना आवश्यक मराठी पाठ्यपुस्तके, वृत्तपत्रे, बाल मासिके, शिक्षकांसाठी संदर्भसाधने यांची खरेदी करुन पात्र ठरलेल्या शाळांना राज्य मराठी विकास संस्थेच्या स्वखर्चाने पाठविण्यात येईल.

**(इ) मदत करण्याचे टप्पे व अटी आणि शर्ती -**

१. राज्य मराठी विकास संस्थेने मदत म्हणून पाठविण्यात आलेली मराठी पाठ्यपुस्तके /वृत्तपत्रे /बाल मासिके त्याच शाळांच्या पहिली ते दहावी पर्यतच्या गरजू आणि गुणवंत विद्यार्थांमध्ये वाटप करणे बंधनकारक राहील.
२. आपल्या शाळेला वितरित केलेल्या मराठी पाठ्यपुस्तके / बाल मासिकांचे विद्यार्थ्यांमध्ये वाटप झाल्यानंतर प्रत्येक लाभार्थी विद्यार्थ्याची इयत्ता, तुकडी, विद्यार्थ्याचे नाव, पुस्तके स्वीकृत केल्याची स्वाक्षरी तसेच प्रत्येक विद्यार्थ्याचा अभिप्राय या तपशीलासहीत सदर अहवाल राज्य मराठी विकास संस्थेस पाठविणे बंधनकारक राहील.

३. आपल्या मराठी माध्यामाच्या शाळेच्या ग्रंथालयात मराठी पुस्तकांची संख्या जास्तीत जास्त असावी. या अनुषंगाने ग्रंथालये अधिकाधिक समृध्द होण्यास मदत होईल असे या योजनेमागील एक उद्दिष्ट आहे.

४. आपल्या शाळेच्या संबंधित शिक्षकांना संदर्भसाधनाचे वाटप करणे आवश्यक आहे. सदर संदर्भसाधनांचे वाटप झाल्यानंतर त्या प्रत्येक लाभार्थी शिक्षकांचा तपशील, पाठ्यपुस्तके व संदर्भसाधने वापरासंदर्भातील अभिप्राय पाठविणे बंधनकारक राहील.

५. आपल्या शाळेची माहिती राज्य मराठी विकास संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे अधिकार राज्य मराठी विकास संस्थेला असतील.

६. या योजनेंतर्गत मदत करण्यात येणाऱ्या शाळांनी परस्पर महाराष्ट्र शासनाच्या इतर कोणत्याही विभागास वा मंडळास अर्ज सादर न करता, विहित नमुन्यात व विहित कालावधीत राज्य मराठी विकास संस्थेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

७. राज्य मराठी विकास संस्थेतर्फे केलेली शैक्षणिक साधनांची मदत (वाटप) फक्त त्या एका संबंधित आर्थिक वर्षासाठी असेल.

८. वरील निकषांच्या आधारे पात्र शाळांची निवड करण्याचे सर्व अधिकार राज्य मराठी विकास संस्थेस असतील.

परिशिष्ट – अ

'बृहन्महाराष्ट्रातील (महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यात)

मराठी शाळांना व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचे वाटप – सन २०२५-२६

मराठी माध्यमांच्या शाळांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

(पूर्णपणे भरलेला अर्ज व संबंधित जोडपत्रे, संचालक, राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, पहिला मजला, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई – ४०० ००१ या पत्त्यावर विहित कालमर्यादेत पाठवावा. तसेच पूर्ण भरलेला अर्ज व संबंधित जोडपत्रे स्कॅन करून rmvs_mumbai@yahoo.com / project3.rmvs@gmail.com या इ पत्त्यांवर इ-टपालाद्वारे (इ मेल) विहित कालमर्यादेत पाठवावा. कालमर्यादेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

१) शाळेचे नाव व पत्ता :-
(संपर्क क्रमांक व इ-पत्त्यासह)

२) शाळा शासन मान्यता प्राप्त आहे का? असल्यास नोंदणी क्रमांक व दिनांक :-
(नोंदणी प्रत जोडावी. - जोडपत्र -१)

३) शाळा चालक संस्थेची घटना/ नियमावली आहे का? :-
असल्यास, त्यास शासनाची मान्यता आहे का?
(घटनेची प्रत जोडावी. - जोडपत्र -२)

४) संस्थेचे (शाळा) कार्यकारी मंडळ आहे काय? :-
असल्यास, कार्यकारिणीच्या सदस्यांची नावे व पत्ते
(यादी सोबत जोडावी. - जोडपत्र – ३)

५) शाळेने मागील ३ वर्षात शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन होण्यासाठी :-
आयोजित केलेल्या कार्यशाळा/शिबीरे/ प्रशिक्षण वर्ग
यासंबंधीचा तपशील (जोडपत्र – ४)

६) शाळेमध्ये मराठी माध्यमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या/ :-
मराठी माध्यमात शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या:-
(अर्जासोबत जोडावे – जोडपत्र – ५)

७) शाळेचे ग्रंथालय आहे का? ग्रंथालयातील मराठी पुस्तकांची संख्या किती आहे :-
(अर्जासोबत जोडावे – जोडपत्र – ६)

८) शाळेला शासनाकडून वा इतर कोणाकडून मराठी पाठ्यपुस्तकांचे/शैक्षणिक :-
साधनांचे मोफत वाटप केले जाते का?
(अर्जासोबत जोडावे – जोडपत्र – ७)

९) मदत म्हणून आवश्यक असणारी पाठ्यपुस्तके, बाल मासिके,शिक्षकांसाठी :-
संदर्भसाधने यांची नावे व संख्या
(जोडपत्र – ८)

प्रमाणित करण्यात येते की, शाळातर्फे देण्यात आलेली वरील सर्व माहिती सत्य आहे. सदर माहिती खोटी किंवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास, शाळा कार्यवाहीस अपात्र ठरविण्यात यावी व सदरहू शाळेस कोणत्याही प्रकारची मदत देऊ नये किंवा यापुढेही देण्यात येऊ नये.

दिनांक :

ठिकाण :

आपला,

( )

मुख्याध्यापक

शाळेचा शिक्का